महाराष्ट्र टाइम्स ९/११/२०२३, P-11 (C)

# सहकारी संस्था पारदर्शी होणार

**वृत्तसंस्था,** नवी दिल्ली

सहकारी सोसायट्या म्हणजे गैरव्यवहारांचे कुरण हा समज आता पुसला जाणार आहे. देशातील सुमारे ६५ हजार सहकारी सोसायट्यांचे मार्च २०२४पर्यंत संगणकीकरण अर्थात डिजिटायझेशन करण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठेवले आहे. यासाठी प्रकल्प व्यवस्थापक म्हणून दी नॅशनल बँक फॉर ॲग्रीकल्चर ॲंड रुरल डेव्हलपमेंट अर्थात 'नाबार्ड'ची नेमणूक करण्यात आली आहे. 'नाबार्ड'चे अध्यक्ष शाजी के. व्ही. यांनी ही माहिती बुधवारी दिली.

नाबार्ड या सर्व ६५ हजार सहकारी सोसायट्यांचे, सहकारी संस्थांचे संगणकीकरण केंद्रीय सहकार मंत्रालय तसेच राष्ट्रीय स्तरावरील पर्यवेक्षण व अंमलबजावणी समितीच्या मार्गदर्शनाखाली करणार आहे. याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून आतापर्यंत १० हजार सहकारी संस्थांचे डिजिटायझेशन करण्यात आले आहे. हाच वेग कायम राखून ६५ हजार सोसायट्यांचे डिजिटायझेशन केले जाईल, असे शाजी के. व्ही. यांनी सांगितले. ते सधन संस्थेतर्फे आयोजित एका परिषदेत बोलत होते.

**नाबार्डची निरीक्षणे**

- सहकारी संस्थांमध्ये वाढती अकार्यक्षमता
- कारभारात मोठ्या प्रमाणात विसंगती
- लेखा तपशील अद्ययावत न राखण्याचे प्रमाण वाढते

सहकारी संस्थांच्या कारभारात मोठ्या प्रमाणावर विसंगती आढळून येत आहे. यामुळे सहकारी संस्थांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे. सहकारी संस्थांना कार्यक्षम बनवण्यासाठी आणि त्यांच्या कारभारातील पारदर्शकता वाढवण्यासाठी तसेच त्यांना व्यवसायसाखळीतील महत्त्वाचा घटक बनवण्यासाठी त्यांचे संगणकीकरण करणे अगत्याचे झाले आहे. नाबार्ड सहकारी संस्थांसाठी आणि ग्रामीण क्षेत्रासाठी डेटा वेअरहाउसची निर्मिती करत आहे. हे डेटा वेअरहाउस आगामी सहा महिन्यांत कार्यरत होईल, अशी अपेक्षा आहे. डेटा वेअरहाऊस कार्यरत झाल्यानंतर सहकारी संस्थांना त्यांच्या ऋणकोंना लाभ देण्यासाठी त्याचा वापर करण्याची अनुमती दिली जाईल, असेही शाजी म्हणाले.

सूक्ष्मवित्त क्षेत्राचा विस्तार देशभरात समान स्तरावर झालेला नाही. या प्रकारचा वित्तपुरवठा करणाऱ्या एकूण संस्थांपैकी देशाच्या पूर्व व दक्षिण भागांत दोन तृतीयांश संस्था एकवटल्या आहेत. देशाच्या उत्तर, मध्य आणि पश्चिम भागांत उरलेल्या सूक्ष्मवित्त संस्था आहेत. त्यामुळे ही असमानता दूर करताना या सर्व संस्थांचे संगणकीकरण गरजेचे आहे. संगणकीकरण न झाल्यास प्रादेशिक असमतोलाकडे आपले दुर्लक्ष झाले आहे असा याचा अर्थ होईल, याकडे शाजी यांनी या परिषदेत लक्ष वेधले.